


परळी

# संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 130 | गुरुवार दि. 04 जुन 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060




# भव्य आयोजन नसतानाही लोकनेत्याच्या अभिवादनासाठी गोपीनाथ गडावर मोठी गर्दी!

➲ ना.पंकजाताई मुंडे यांचे सामाजिक बांधिलकीची साद घालणारे भाषण ; शेती, शेतकरी, वृक्षारोपण, ऊसतोड कामगारांच्या हिताचा जाहीर केला

## दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा- पंकजाताई मुंडे





परळी वैजनाथ, दि. 03---

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती दिनानिमित्त आज गोपीनाथ गडावर दर्शनासाठी सकाळपासूनच गर्दी झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत आवाहनाला प्रतिसाद म्हणून भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित नसतानाही लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. याप्रसंगी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरणपूरक लोकसहभागाला साद घालणारे भाषण करत वृक्षारोपण,जैविक व नैसर्गिक शेती ,स्वाभिमान, समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, आणि शेतकरी हितासाठी रचनात्मक काम असे संकल्प जाहीर केले. सर्वांनी हे संकल्प पूर्ण करावे आणि पर्यावरणीय सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी योगदान द्यावे असे सांगत दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा असे आवाहन केले.

लोकनेते मुंडे साहेब यांच्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम आज गोपीनाथगडावर अत्यंत साधेपणाने झाला. यावेळी ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, त्यांच्या मातोश्री प्रज्ञाताई, जावई गौरव खाडे , नातू आर्यमन पालवे,अगस्त्य खाडे, बंधू अजय मुंडे, रामेश्वर मुंडे यांसह मुंडे कुटुंबियांनी समाधीचे दर्शन घेतले. त्याबरोबर मुंडे साहेबांना आवडणाऱ्या पदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. याप्रसंगी आयोजित भजनाच्या कार्यक्रमात ना पंकजाताई मुंडे यांनी कुटुंबासह सहभाग घेतला. कार्यक्रमास महंत राधाताई सानप, आ.नमिता मुंदडा, माजी मंत्री बदामराव पंडित, बाळदादा पवार, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हाईस चेअरमन रमेश कराड, भाजप नेते गणेश हाके, प्रवीण घुगे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, बाजीराव धर्माधिकारी, माधवराव निर्मळ,योगेश क्षीरसागर , प्रा. लक्ष्मण हाके, गायताई कराड,, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी न. प. गटनेते वैजनाथ सोळंके,, भाजप गटनेते प्रा.पवन मुंडे, भाजपा प्रदेश प्रवक्ता राम कुलकर्णी, आदींसह बीड जिल्ह्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधी भाजप पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

### एक पेड बाप के नाम' उपक्रम प्रत्येकाने राबवावा ; नवरात्रात नवा संकल्प जाहीर करणार

**● 'एक पेड बाप के नाम', गडावर वृक्षारोपण ; उपस्थितांना रोपांचे वाटप**

पर्यावरणासमोरील आव्हानांचा उल्लेख करत पंकजाताई मुंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या ' एक पेड मॉ के नाम' उपक्रमाबरोबरच "एक पेड़ बाप के नाम" हा संकल्प राबविण्याचे आवाहन केले. प्रत्येकाने किमान 11 झाडे लावून त्यांचे संवर्धन करावे, प्रत्येकानी कौटुंबिक ,सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमात वृक्षारोपण करावे आणि त्याचे संवर्धन करावे असे त्यांनी सांगितले. या संकल्पाची सुरुवात त्यांनी गडाच्या परिसरात वृक्षारोपण करून केली. यावेळी विविध वृक्षांची सुमारे एक हजार रोपे उपस्थितांना वाटप करण्यात आली.

**● शेती, शेतकरी, ऊसतोड कामगारांच्या बांधिलकीचा संकल्प**

शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, रासायनिक खतांऐवजी जैविक व नैसर्गिक शेतीचा आग्रह धरला पाहिजे. या संकल्पाची सुरुवात मी स्वतः पासून करणार असून मी स्वतः आता जैविक व नैसर्गिक प्रत्यक्षात करणार आहे आपण सर्वांनी यासाठी योगदान दिले पाहिजे. शेतकऱ्यांच्या जीवनाशी एकरुप होण्याकरिता "जावे त्यांच्या वंशा, तेव्हा कळे' या न्यायाप्रमाणे मी स्वतः नांगर धरणार, ट्रॅक्टर चालवणार आणि शेती करणार आहे अशी घोषणा त्यांनी केली. तसेच ऊसतोड कामगारांच्या जीवनाशी एकरूप होत त्यांच्या सोबत 12 डिसेंबरला प्रत्यक्ष ऊसाच्या फडात जाऊन ऊसतोडणी करण्याचाही संकल्प त्यांनी व्यक्त केला.

**● नवरात्रोत्सवात नवा सामाजिक संकल्प जाहीर करणार**

आज पर्यावरणाला पूरक होतील अशा प्रकारचे संकल्प आपण हाती घेतले आहेत यासाठी मी स्वतः निर्धार केला आहे आपणही या संकल्पना प्रत्यक्षात उतरण्यासाठी कामाला लागावे असे आवाहन यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले. तसेच आगामी नवरात्रोत्सवात नवा सामाजिक संकल्प जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सामाजिक सलोखा आणि विकासाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सामाजिक घडी अधिक मजबूत करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### सर्व नेते येऊन गेले, भविष्यात पंतप्रधान नरेंद्र मोदीही गोपिनाथगडावर येतील

**● भविष्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी ही गोपीनाथ गडावर येतील**

वंचित ,उपेक्षित ,दुर्बल घटकांना न्याय देण्याची भूमिका आयुष्यभर जपणाऱ्या आपल्या मुंडे साहेबांना अभिप्रेत असेच काम तुम्ही आणि मी आपण सर्वांनी करायचे आहे. आपण जसे वागू तसे परिणाम दिसत असतात. त्यामुळे स्वाभिमान जपत आपण स्वर्गातही मुंडे साहेबांची मान उंचावेल असेच काम केले पाहिजे. सामाजिक सलोखा आणि आपल्यापेक्षा क्षीण व्यक्तीच्या मदतीला आपण आले पाहिजे. जागतिक स्तरावर आज संकटाची परिस्थिती असून आपल्या देशात ही परिस्थिती उद्भवू नये यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने आपल्याला आवाहन करत आहेत. या देश कार्यात आपण सहभाग घेतला पाहिजे. आपल्या कृतीतून आणि माणसाला माणूस म्हणून जगता यावे या उद्देशाने प्रत्येकाने योगदान देणे अभिप्रेत आहे. गोपीनाथ गडाच्या उभारणीला अमित शहा, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अनेक मंत्री, अनेक पक्षप्रमुख आले होते. सर्वच शीर्षस्थ नेते आपल्या गडावर येऊन गेले आहेत आता एकमेव पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या गडावर यायचे राहिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी भविष्यात गोपीनाथ गडावर नक्कीच येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**● दिवंगत एजाजभाई देशमुख यांच्या परिवाराला पाच लाख रूपयांची मदत**


भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष बीड येथील दिवंगत नेते एजाजभाई देशमुख यांच्या निधनानंतर त्यांच्या परिवाराला गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. आजच्या स्मृतीदिनी ना. पंकजाताई मुंडे यांनी एजाजभाई यांच्या कुटुंबियांना आज 5 लाख रुपयांचा धनादेश त्यांच्या परिवाराकडे सुपूर्द करून आपला दिलेला शब्द पाळला.











## मृदा, जल आणि वृक्ष संवर्धन केले तरच भविष्य उज्ज्वल – जलनायक मयंक गांधी

➲ सरस्वती नदी पुनरुज्जीवन कामाचा शुभारंभ; हजारोंच्या उपस्थित संवाद मेळावा संपन्न





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) मौजे दिंद्रुड येथे सरस्वती नदीच्या खोलीकरण व रुंदीकरण कामाचा शुभारंभ जलनायक मयंक गांधी, टाटा ट्रस्टचे रवींद्रजीत सिंह व राकेश सिंह, आनंद बारिया, रिमी ओबेरॉय, देवदत्त सिंह, देव रंजन यांच्या उपस्थितीत झाला. ग्लोबल विकास ट्रस्ट आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पांतर्गत सरस्वती नदीच्या सुमारे 5 किमी पात्राचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येणार असून 35 रिचार्ज शाफ्ट उभारले जाणार आहेत. यामुळे जलसाठा वाढून भूजल पुनर्भरणास मोठी चालना मिळणार आहे.

तद्नंतर झालेल्या नागरिक संवाद मेळाव्यात जलनायक मयंक गांधी यांनी जलसंधारण, पाणी व्यवस्थापन आणि शाश्वत शेतीचे महत्त्व विशद केले. "पाणी उपलब्ध झाले तर शेतीसह ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळते. त्यामुळे जलसंधारणासोबत पाण्याचा नियोजनबद्ध वापरही पान 3 वर




# फसव्या कर्जमाफीच्या जी आर ची सादोळा येथे केली होळी



माजलगाव प्रतिनिधी शेतकऱ्यांना वेळोवळी सरकारने वेढ्यात काढले आहे आणि आज देखील ते सातत्याने चालू आहे परंतु अखिल भारतीय किसान सभा ही एकमेव शेतकरी संघटना आहे की ज्या संघटनेने शेतकऱ्यांना कधीही गाफील ठेऊन सरकारला मॅनेज झाली नाही,

कारण ही संघटना धोरणात्मक लढाई संपूर्ण देशात लढते आपल्या राज्यात सर्व संघटनांनी मिळून आंदोलन केले आणि शेतकऱ्यांची करमुक्ती करण्याची तारीख ठरवायला शासनाला भाग पाडले आज ती तारीख आली परंतु या गॅप मध्ये कर्जमुक्तीच्या आंदोलनात मुख्य भूमिका बजावली ते बच्चू कडू हे सरकारमध्ये सामिल झाले आणि सर्व डाव बदलला आणि शेतकऱ्याची सरकारने फसवणूक करायला सुरुवात केली परंतु आजही किसान सभा रस्त्यावर आहे जी फक्त आणि फक्त शेतकऱ्याच्या हितासाठीच निर्णय घेईल याचाच एक भाग काल सरकारने कर्जमुक्तीचा जी आर काढला आणि या जी आर मध्ये स्पष्ट सांगितले की या अगोदर ज्या शेतकऱ्यांची 2019 ला कर्ज माफी झाली असेल त्यांना फक्त 50000 रुपयापर्यंतच कर्ज मुक्त केले जाईल म्हणजे या शेतकऱ्यांचे आज पर्यंत अतिवृष्टीने नुकसान झाले नाही का हा शेतकरी लुटला गेला नाही का असा सवाल आता शेतकरी नेते विचारतात काल निघालेल्या या जी आर चा जाहीर निषेध करत राज्याचे शेतकरी नेते कॉम्रेड डॉ. अजित नवले यांनी सर्व शेतकऱ्यांना आव्हान केले की या जी आर ची सगळीकडे होळी करा आणि या अहवानाला प्रतिसाद देत सादोळा येथील शेतकऱ्यांनी सहभागी होऊन सादोळा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा/चौक येथे या निघालेल्या फसव्या जी आर चा निषेध करत जी आर ची होळी केली,

# विनोदाचा बादशाह : अशोक सराफ !

## (4 जून: अशोक सराफ वाढदिवस शुभेच्छा विशेष.)

अशोक सराफ हे एक भारतीय विनोदी अभिनेता आहेत, जे मराठी आणि हिंदी चित्रपटांसह दोन्ही भाषांमधील थिएटरमध्ये काम करण्यासाठी ओळखले जातात. सराफ यांना चार फिल्मफेअर मराठी पुरस्कारांसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना मराठी चित्रपटसृष्टीतील महानायक- सर्वश्रेष्ठ अभिनेता, अशोक सम्राट किंवा मामा असे संबोधले जाते. सन 2023मध्ये त्यांना महाराष्ट्र भूषण हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील सर्वोच्च नागरी सन्मान मिळाला. अशोक सराफ यांनी विविध मराठी नाटके आणि हिंदी मालिकांमध्येही काम केले आहे. त्यानंतर त्यांनी अनिकेत टेलिफिल्म्स हे स्वतःचे प्रोडक्शन हाऊस विकसित केले, जे त्यांची पत्नी निवेदिता जोशी- सराफ हाताळते. आज वाढदिवसाच्या त्यांना श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींच्या सदर लेखाद्वारे करोडो हार्दिक शुभेच्छा!.... संपादक.

अशोक सराफ हे एक भारतीय विनोदी अभिनेता आहेत, जे मराठी आणि हिंदी चित्रपटांसह दोन्ही भाषांमधील थिएटरमध्ये काम करण्यासाठी ओळखले जातात. सराफ यांना चार फिल्मफेअर मराठी पुरस्कारांसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना मराठी चित्रपटसृष्टीतील महानायक- सर्वश्रेष्ठ अभिनेता, अशोक सम्राट किंवा मामा असे संबोधले जाते. सन 2023मध्ये त्यांना महाराष्ट्र भूषण हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील सर्वोच्च नागरी सन्मान मिळाला. सन 1980च्या दशकाच्या सुरुवातीपासून सराफांना मराठी चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका मिळू लागल्या. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगावकर आणि महेश कोठारे यांच्या संयोजनाने 1985पासून मराठी चित्रपटसृष्टीत कॉमेडी चित्रपटांची लाट निर्माण केली जी एक दशकाहून अधिक काळ टिकली. एक डाव भुताचा-1982, धुम धडाका-1985, गम्मत जम्मत-1987, भुताचा भाऊ-1989, बाळाचे बाप ब्रह्मचारी-1989, अशी ही बनवा बनवी-1988 आणि हे प्रमुख नायक म्हणून त्यांच्या यशस्वी मराठी चित्रपटांमध्ये आहेत. आयत्या घरात घरोबा-1991. बॉलीवूडमध्ये त्यांनी करण अर्जुन-1995, येस बॉस-1997, जोरू का गुलाम-2000, सिंघम-2011 इत्यादी आणि डोंट वरी हो जायेगा यासह दोन हिंदी टेलिव्हिजन सिटकॉममध्ये काम केले.

अशोक सराफ यांचा जन्म मुंबई येथे दि.4 जून 1947 रोजी झाला. ते दक्षिण मुंबईच्या चिखलवाडी परिसरात लहानाचे मोठे झाले आणि शिक्षणासाठी डीजीटी विद्यालयात गेले. ज्येष्ठ अभिनेते अशोक कुमार यांच्या नावावरून त्यांचे नाव अशोक ठेवण्यात आले. त्यांचे बालपण दक्षिण मुंबईतील चिखलवाडी येथे गेले. त्यांचे शालेय शिक्षण डीजीटी विद्यालय मुंबई येथे पूर्ण झाले. सन 1990मध्ये त्यांचा विवाह अभिनेत्री निवेदिता जोशी यांच्याशी झाला. त्यांनी



गोव्यातील मंगुशी मंदिरात लग्न केले, जेथे सराफचे कुटुंब मूळचे आहे. त्यांना अनिकेत सराफ नावाचा मुलगा आहे जो एक आचारी आहे. अशोक सराफ सन 1969पासून चित्रपट आणि दूरचित्रवाणी उद्योगात कार्यरत आहेत. त्यांनी 250हून अधिक मराठी चित्रपटांमध्ये काम केले आहे, त्यापैकी 100हून अधिक व्यावसायिकरित्या यशस्वी ठरले आहेत. त्यांनी मुख्यतः कॉमेडी चित्रपटांमध्ये काम केले आहे. सन 1969मध्ये जानकी या मराठी चित्रपटातून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी दोनी घरचा पाहुणा, जवळ ये लावू नको, तुमचा आमचा जमला, चिमणराव गुंड्याभाऊ, डीड शहाणे, हळदी कुंकू, दुनिया करी सलाम आणि इतर चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. सन 1970 आणि 1980चे दशकात लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन आणि महेश कोठारे यांच्यासोबत त्यांनी मराठी चित्रपटांमध्ये काम करत राहिले. अशी ही बनवा बनवी, आयत्या घरात घरोबा, बाळाचे बाप ब्रह्मचारी, भुताचा भाऊ आणि धुम धडाका हे काही उल्लेखनीय मराठी चित्रपट आहेत ज्यात त्यांनी अभिनय केला आहे.

अशोक सराफ यांनी विविध मराठी नाटके आणि हिंदी मालिकांमध्येही काम केले आहे. त्यानंतर त्यांनी अनिकेत टेलिफिल्म्स हे स्वतःचे प्रोडक्शन हाऊस विकसित केले, जे त्यांची पत्नी निवेदिता जोशी- सराफ हाताळते. त्यांनी 1980मध्ये अभिनेता लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत अशी ही बनवा बनवी, बाळाचे बाप ब्रह्मचारी असे अनेक हिट कॉमेडी जॉनर चित्रपट केले. मराठी चित्रपटसृष्टीतील आणखी एक विनोदी अभिनेता लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबतची जोडी यशस्वी झाली, ज्यांनी अनेक हिंदी चित्रपटांमध्येही भूमिका केल्या आहेत. सराफ यांच्यासोबत बेर्डे आणि सचिन पिळगावकर यांनी अनेक मराठी चित्रपटांमध्ये काम केले. त्यांनी अशी ही बनवा बनवी मध्ये मराठी चित्रपटसृष्टीतील दोन सुपरस्टार सचिन पिळगावकर आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या प्रमुख भूमिकेत मोठ्या यशाची चव चाखली. हा चित्रपट चांगलाच हिट ठरला होता. अशोक सराफ यांनी बॉलिवूडमध्ये महत्त्वाच्या भूमिका केल्या. सिंघम, प्यार किया तो डरना क्या, गुप्त, कोयला, येस बॉस, जोरू का गुलाम आणि करण अर्जुन या चित्रपटांतील काही भूमिका लक्षात राहतात.

अशोक मामांनी ये छोटी बड़ी बातें आणि हम पांच- आनंद माथूरच्या भूमिकेत सारख्या मालिका यशस्वी ठरल्या. टेलिव्हिजन मालिकांमध्ये देखील काम केले आहे. त्यांचा डोंट वरी हो जायेगा हा कॉमेडी शो होता, जो 1990च्या दशकात सहारा टीव्हीवर प्रसारित झाला होता. सराफ यांनी त्यांच्या कारकिर्दीत मराठी नाटकांमध्ये अनेक भूमिका साकारल्या आहेत. हमीदाबाईची कोठी, अनाधिकृत, मनोमिलन, हे राम कार्डिओग्राम, डार्लिंग डार्लिंग, सारखा चाटित दुखते, लगीनघाई, व्हॅक्यूम क्लीनर ही काही महत्त्वाची नाटके आहेत. सन 2012मध्ये तळेगावजवळ मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर एका मोठ्या कार अपघातात सराफ बचावले होते.

!! विनोदाच्या बादशहाला वाढदिवसाच्या करोडो हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, पॉवर हाऊसच्या मागे, गडचिरोली.**
**फक्त दूरभाष- 9699836717.**

# सिद्धीविनायक अर्बन मध्ये लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांना स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन



माजलगाव (प्रतिनिधी):

बीड जिल्ह्याचे भूषण आणि बहुजनांचे कैवारी, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त सिद्धीविनायक अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. शाखा माजलगाव येथे त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

या निमित्ताने बँकेच्या माजलगाव शाखेत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले.

"मुंडे साहेबांचे कार्य आणि त्यांचे विचार हे नेहमीच समाजकार्यासाठी प्रेरणादायी राहतील," अशा भावना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. प्रशांत पाटील यांनी याप्रसंगी व्यक्त केल्या.

या अभिवादन प्रसंगी भाजपा माजलगाव शहर उपाध्यक्ष मा. पंचायत समिती सदस्य अविनाश कांडुरे, परशुराम हिंदू सेवासंघांचे बीड जिल्हा अध्यक्ष ॲड. अरविंद पाटील, डॉ. दीपक जोशी, मा. सरपंच प्रल्हाद दळवी, भाजपा पदाधिकारी भरत जोशी, चंद्रकांत देशमुख, शुभम वांझरखेडे, उतरेश्वर खुर्पे, संतोष नांदुरकर दिगंबर वाघमोडे यांच्यासह सिद्धीविनायक अर्बनचे कर्मचारी व स्थानिक आणि ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी शांतता पाळून साहेबांच्या स्मृतींना उजाळा दिला.

# टोकवाडी येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या पुण्यस्मरणनिमित्त अभिवादन


## सामान्यांच्या हक्कासाठी झटणारा लोकनेता म्हणजे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब–डॉ. राजाराम मुंडे

## लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब जाती-पातीच्या भिंतीपलीकडचे लोकनेते होते" – संजय मुंडे

## लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी" – दिलीप भालेराव

## जनसेवेचा आदर्श म्हणजे लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब – डॉ. भरत मुंडे







प्रतिपादन दिलीप भालेराव यांनी केले. लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब जाती-पातीच्या भिंतींपलीकडचे लोकनेते होते" असे प्रतिपादन संजय मुंडे सर यांनी केले तर जनसेवेचा आदर्श म्हणजे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब होते असे प्रतिपादन डॉ. भरत मुंडे यांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

टोकवाडी ग्रामस्थ व संजय मुंडे सर यांच्या वतीने परळी वैजनाथ तालुक्यातील टोकवाडी येथे जनसामान्यांचे आधारस्तंभ,एक उत्तुंग व्यक्तिमत्व, लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे साहेब यांना पुण्यस्मरण निमित्त अभिवादन करण्यात आले. सभेला गर्दी खेचणारे प्रभावी वक्ते, ग्रामीण भागाच्या विकासाचा ध्यास घेतलेले दूरदृष्टीचे नेतृत्व आणि सामान्य माणसाच्या दुःखाशी नाळ जुळवून घेणारे लोकनेते म्हणून गोपीनाथराव मुंडे यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला होती. त्यांच्या राजकीय कारकिर्दीने लाखो कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली असून जनतेच्या मनात त्यांनी अढळ स्थान निर्माण केले आहे.

लोकनेते कै.गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यसमरणा निमित्त डॉ. राजाराम मुंडे, डॉ. भरत मुंडे, संजय मुंडे सर, दिलीप भालेराव, मारोती मुंडे गुरुजी यांनी साहेबानाच्या आठवणींना उजाळा दिला. 'अमर रहे अमर रहे मुंडे साहेब अमर रहे 'जय घोष देण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. मुंडे साहेबांच्या संघर्षमय जीवनप्रवासाला उजाळा देत त्यांच्या कार्याची आठवण करून दिली. शेतकरी, कामगार, महिला, युवक आणि वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला. ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा आणि सामाजिक न्यायासाठी त्यांनी उभारलेला लढा आजही अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे वक्त्यांनी सांगितले. लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारे लोकनायक होते. सामान्यांच्या हक्कासाठी झगडणारा हा संघर्षयात्री आज आपल्यात नसला तरी त्यांचे विचार आणि कार्य सदैव मार्गदर्शक राहतील," अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

यावेळी डॉ.राजाराम मुंडे, सुग्रीव बापु मुंडे, संजय मुंडे सर, मारोती मुंडे गुरुजी, राजाभाऊ काळे, डॉ.भरत मुंडे, देविदास काळे गुरुजी, गणेश दशरथ मुंडे, **पान 3 वर**

# मा श्री सतिश ( बप्पा ) बडे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधुन भोगलवाडीच्या जवलग सहकाऱ्यांनी बप्पांचा केला सन्मान



भोगलवाडी ( बाबुराव तिडके ) वडवणी नगरपंचायतचे मा नगरसेवक तथा आ धनंजयजी मुंडे साहेबांचे निकटवर्तिय मा श्री सतिश ( बप्पा ) बडे यांचा 3 जुन हा जन्मदिवस बप्पा सर्वांशी आपुलकिने व चांगले काम करत असल्यामुळे त्यांचे प्रत्येकाशी स्नेहांकित तथा मित्रत्वाचे घनिष्ठ संबंध आहेत त्यामुळे बप्पांच्या कार्यशैलिचा व मित्रत्वाचे जाळे फार दुर पर्यंत पोहचलेले आहेत भोगलवाडी या गावामध्ये बप्पांना मानणारा वर्ग मोठा आहे त्यांचे परम मित्र श्री महेश ( भैय्या ) मुंडे श्री नंदकिशोर तिडके श्री संतोष तिडके श्री संजय मुंडे यांनी बप्पांचे निवासस्थान वडवणी येथे जाऊन त्यांचा सन्मान केला बप्पांना पुढील आयुष्य सुख समाधानी व भरभराटीचे जाऊन बप्पांच्या हातून सत्कार्य घडुन गोरगरीबांचे कल्याण होओ अशा प्रकारच्या बप्पांच्या जन्मदिनी शुभेच्छा त्यांच्या परम मित्रानी बप्पांना दिल्या बप्पा नगरसेवक असताना त्यांनी अतिशय चांगले काम केले भविष्यात देखिल बप्पांनी केलेल्या चांगल्या कामाचे फळ बप्पांना नक्कीच मिळणार असून या वडवणी शहरातील जनतेच्या पाठबळावरच लोकप्रतिनीधी म्हणून काम करण्याची संधी मा श्री सतिश ( बप्पा ) बडे यांना मिळणार आहे शेवटी जन्मदिना निमीत्त केलेल्या सन्माना बद्धल बप्पांनी सर्वांचे आभार व्यक्त केले

# योगिराज हॉस्पिटलसमोरील वाळूचा ढिगारा ठरतोय मृत्यूचा सापळा; अपघाताची वाट पाहतंय प्रशासन!



माजलगाव | प्रतिनिधी

माजलगाव शहरातील डॉक्टर लेन व समता कॉलनी परिसरात असलेल्या योगिराज हॉस्पिटलसमोर रस्त्यावर टाकण्यात आलेल्या वाळूच्या प्रचंड ढिगाऱ्यामुळे नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. रस्त्याचा मोठा भाग व्यापून बसलेल्या या वाळूच्या ढिगाऱ्याकडे संबंधित प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे चित्र दिसून येत असून, एखादा गंभीर अपघात झाल्यानंतरच कारवाई होणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

योगिराज हॉस्पिटलसमोर टाकण्यात आलेली वाळू आता बांधकाम साहित्य न राहता नागरिकांसाठी "मृत्यूचा सापळा" बनली आहे. रस्त्यावर पसरलेल्या वाळूमुळे दुचाकी घसरुन अपघात होण्याचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. विशेष म्हणजे हा परिसर रुग्णालयांचा आणि निवासी वसाहतींचा असल्याने येथे दिवसभर रुग्ण, ज्येष्ठ नागरिक, महिला व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते.

रात्रीच्या वेळी वाळूचा अंदाज न आल्याने दुचाकीस्वार थेट घसरून पडण्याच्या घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रुग्णवाहिकांनाही मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. एखाद्या गंभीर रुग्णाला वेळेत उपचार मिळाले नाहीत किंवा या ढिगाऱ्यामुळे अपघात झाला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

रस्त्यावर बांधकाम साहित्य टाकणे हा नियमांचा उघड भंग असतानाही संबंधित व्यक्तींवर कोणतीही कारवाई होत नसल्याने नगरपालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सामान्य नागरिकांकडून किरकोळ चुका झाल्यास तत्काळ दंडात्मक कारवाई करणारे प्रशासन या प्रकरणात मात्र मौन का बाळगत आहे, याबाबत संताप व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या जीवाशी खेळणारा हा वाळूचा ढिगारा तात्काळ हटवून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा एखादी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

# मा पोलिस अधिकारी श्री दिलिप ( नाना ) तिडके यांच्या वाढदिवसा निमित्त भोगलवाडी येथिल नागरीकांनी दिल्या भरभरून शुभेच्छा ॥



धारूर ( बाबुराव तिडके ) भोगलवाडी गावचे श्री दिलिप तिडके हे आदर्श व्यक्तिमत्व पोलिस खात्यामध्ये काम करत असताना त्यांनी विविध पदावर काम करून ठाण्याचे फौजदार या पदा पर्यंत मजल मारली पोलिस खात्याला शोभेल असे नितळ काम श्री दिलिप तिडके यांनी केले त्यांच्या संसारातून लक्ष्मी रुपी सोन्याचा धुर निघतो पण त्यांच्याकडे अहंकार गर्व अजिबात नाहीए मंत्री ताईसाहेब यांच्या घराण्याचे ते निष्ठावंत कार्यकर्ते आहेत गावामध्ये त्यांच्या शब्दाला फार मोठी किंमत आहे गावचे राजकारण कोणत्या बाजुला देऊन सत्ता कोणाच्या ताब्यात द्यायची यामध्ये ते माहिर हुशार आहेत त्यांच्यामध्ये खरे पणा सत्यवादी उच्च विचारसरणी आपल्या हातून कोणाचे वाईट होणार नाही याची काळजी ते पुरेपुर घेतात त्यांची नियत चांगली असल्याने त्यांच्या घरामध्ये आज लक्ष्मीरुपी ऐश्वर्य आहे श्री दिलीप तिडके हे अधिकारी राहिलेले असले तरी ते स्वःता शेतामध्ये खूप कष्ट करून मेहणत घेतात व चांगल्या प्रकारे शेती पिकवतात आज नानांच्या माध्यामातून अनेक कुटुंब कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात शांत संयमी मित्तभाषी रांगडेपणा हा त्यांचा चांगल्या प्रकारे स्वभाव असल्याने भोगलवाडी सह या परिसरामध्ये नाना या नावाने ते परिचित आहेत स्व आई सरस्वती व स्व वडिल विश्वनाथराव यांचे संस्कार शिकवन व विचार हे तिडके घराणे अंगीकारत असल्याने नामवंत घराणे म्हणून श्री दिलिप तिडके यांच्या घराण्याकडे पाहिले जाते नानांचा जन्मदिन 3 जुन असल्याने या आपल्या लाडक्या सुपुत्राला जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी भोगलवाडी येथिल नेते प्रतिष्ठीत व्यक्ती पुढारी नागरीक पत्रकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सर्वांनी साहेबांना आयुष्यमाण - भव म्हणून जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या ॥

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

# ट्रोलिंगच्या युगातील समाजजीवन आणि मान-सन्मान

**डॉ. भारत कऱ्हाड**



सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे व्यक्तीच्या प्रतिष्ठेपुढे उभे राहिलेले नवे प्रश्न आणि सामाजिक सौहार्दासमोरील आव्हाने

मानव हा सामाजिक प्राणी आहे. समाजात राहण्यासाठी परस्पर आदर, विश्वास, सहिष्णुता आणि सभ्य संवाद या मूल्यांची आवश्यकता असते. व्यक्तीचा मान-सन्मान हा केवळ त्याच्या पदावर किंवा संपत्तीवर अवलंबून नसून समाजाने त्याच्याविषयी बाळगलेल्या आदरभावनेवर आधारित असतो. परंतु गेल्या काही वर्षांत सोशल मीडियाच्या झपाट्याने वाढलेल्या प्रभावामुळे समाजजीवनामध्ये मोठे बदल घडून आले आहेत. फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब, एक्स, व्हॉट्सअ‍ॅप आणि इतर डिजिटल माध्यमांनी अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य सर्वसामान्यांच्या हातात दिले. हे लोकशाहीच्या दृष्टीने स्वागतार्ह असले तरी त्याचबरोबर ट्रोलिंग, अपमान, दिशाभूल आणि चारित्र्यहनन यांसारख्या नव्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे आजच्या समाजजीवनात मान-सन्मानाचे स्थान आणि त्याचे संरक्षण हा चिंतेचा विषय बनला आहे.

पूर्वी समाजात एखाद्या व्यक्तीची प्रतिमा तयार होण्यासाठी अनेक वर्षे लागायची. शिक्षण, समाजकार्य, प्रशासन, साहित्य, कला, उद्योग किंवा राजकारण या क्षेत्रांत दीर्घकाळ काम करून व्यक्तीला प्रतिष्ठा प्राप्त होत असे. त्या व्यक्तीशी मतभेद असले तरी तिच्या योगदानाचा आदर राखण्याची संस्कृती समाजात होती. सार्वजनिक व्यक्तींवर टीका होत असे, पण त्या टीकेलाही सभ्यतेच्या मर्यादा होत्या. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. एका मोबाईल फोनद्वारे काही सेकंदांत लाखो लोकांपर्यंत पोहोचता येते. ही संवादक्रांती जितकी प्रभावी आहे तितकीच धोकादायकही ठरू शकते.

आज सोशल मीडियावर कोणत्याही व्यक्तीविषयी काहीही लिहिणे, बोलणे किंवा प्रसारित करणे अत्यंत सोपे झाले आहे. अनेकदा माहितीची सत्यता तपासली जात नाही. एखाद्या व्यक्तीच्या भाषणातील एक वाक्य संदर्भाशिवाय प्रसारित केले जाते. फोटो किंवा व्हिडिओमध्ये फेरफार करून दिशाभूल केली जाते. काही जण मनोरंजनाच्या नावाखाली रील्स, मीम्स किंवा पोस्टच्या माध्यमातून व्यक्तींची टिंगलटवाळी करतात. परिणामी समाजात माहितीपेक्षा प्रतिक्रिया आणि विचारांपेक्षा भावना अधिक प्रभावी ठरत आहेत.

ट्रोलिंग ही आजच्या डिजिटल संस्कृतीतील सर्वात चिंताजनक बाब बनली आहे. ट्रोलिंग म्हणजे एखाद्या व्यक्तीला जाणीवपूर्वक लक्ष्य करून तिची खिल्ली उडवणे, अपमान करणे किंवा मानसिक त्रास देणे. यामध्ये अनेकदा अश्लील भाषा, खोटे आरोप आणि वैयक्तिक पातळीवरील हल्ले यांचा समावेश असतो. विधायक टीका आणि ट्रोलिंग यामध्ये मूलभूत फरक आहे. विधायक टीका समाजाला दिशा देते, तर ट्रोलिंग समाजात कटुता निर्माण करते. दुर्दैवाने आज अनेकदा या दोन्ही गोष्टी एकत्र मिसळल्या जात आहेत.

आज कोणतीही व्यक्ती ट्रोलिंगपासून सुरक्षित राहिलेली नाही. राजकारणी, समाजसेवक, शिक्षक, अधिकारी, पत्रकार, कलाकार, लेखक, खेळाडू आणि अगदी न्यायव्यवस्थेशी संबंधित व्यक्तीदेखील सोशल मीडियावरील अवमानाचे लक्ष्य बनत आहेत. काही वेळा त्यांच्या कार्याची चिकित्सा केली जाते, जी आवश्यक आहे; परंतु अनेकदा व्यक्तीच्या कामाऐवजी तिच्या व्यक्तिमत्त्वावर, कुटुंबावर किंवा वैयक्तिक जीवनावर हल्ले केले जातात. ही प्रवृत्ती समाजातील सभ्य संवादासाठी घातक आहे.

याहूनही महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपण अनेकदा भूतकाळातील व्यक्तींना आदर्श मानतो आणि वर्तमानातील व्यक्तींवर कठोर टीका करतो. इतिहासातील नेते, समाजसुधारक आणि महान व्यक्ती यांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे. परंतु जर त्या व्यक्ती आजच्या सोशल मीडियाच्या युगात असत्या, तर त्यांनाही ट्रोलिंगचा सामना करावा लागला नसता का? हा प्रश्न विचारण्यासारखा आहे. कारण सोशल मीडियाचा स्वभावच असा आहे की तो सकारात्मकतेपेक्षा वादग्रस्ततेला अधिक प्रसिद्धी देतो. एखाद्या व्यक्तीची शंभर चांगली कामे दुर्लक्षित राहू शकतात, पण एक छोटी चूक क्षणार्धात व्हायरल होऊ शकते.

प्रत्येक काळाची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती वेगळी असते. त्या त्या काळातील उपलब्ध साधने, आव्हाने आणि मर्यादा यांचा विचार न करता व्यक्तींची तुलना करणे योग्य नाही. मात्र सोशल मीडियावरील चर्चांमध्ये संदर्भ हरवतात आणि केवळ भावनिक प्रतिक्रिया उरतात. यामुळे वस्तुनिष्ठ चर्चेपेक्षा आरोप-प्रत्यारोपांचे वातावरण तयार होते.

या परिस्थितीचा सर्वात मोठा परिणाम समाजातील परस्पर विश्वासावर होत आहे. समाज हा विश्वास आणि आदर यांवर उभा असतो. जर प्रत्येक व्यक्ती दुसऱ्याविषयी संशय बाळगू लागली, प्रत्येक मतभेद शत्रुत्वात बदलू लागला आणि प्रत्येक चर्चा अपमानामध्ये संपुष्टात येऊ लागली, तर सामाजिक वीण सैल होणे अपरिहार्य ठरते. समाजातील विविध घटकांमध्ये संवाद कमी होतो आणि ध्रुवीकरण वाढते. हे लोकशाही आणि सामाजिक एकात्मतेसाठी चांगले लक्षण नाही.

तरुण पिढीवर होणारा परिणामही तितकाच गंभीर आहे. आजचे युवक आणि विद्यार्थी सोशल मीडियाच्या वातावरणात वाढत आहेत. जर त्यांना सतत अपमानास्पद भाषा, ट्रोलिंग, द्वेषपूर्ण पोस्ट आणि वैयक्तिक हल्ले पाहायला मिळाले, तर तेच वर्तन सामान्य असल्याची भावना निर्माण होऊ शकते. सभ्यता, संयम, सहिष्णुता आणि विवेकपूर्ण संवाद यांचे महत्त्व कमी होण्याचा धोका आहे.

अर्थात, सोशल मीडिया पूर्णपणे नकारात्मक नाही. अनेक सामाजिक चळवळी, जनजागृती मोहिमा, आपत्ती व्यवस्थापन आणि लोकहिताचे उपक्रम याच माध्यमातून यशस्वी झाले आहेत. अनेकांना न्याय मिळवून देण्यासाठीही सोशल मीडियाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. परंतु कोणतेही साधन त्याच्या वापरावर अवलंबून असते. सकारात्मक वापर समाज घडवतो, तर नकारात्मक वापर समाज बिघडवतो.

आज आवश्यकता आहे ती डिजिटल साक्षरतेची आणि सामाजिक जबाबदारीची. कोणतीही माहिती पुढे पाठवण्यापूर्वी तिची सत्यता तपासली पाहिजे. टीका करताना सभ्य भाषा वापरली पाहिजे. व्यक्तीपेक्षा विचारांवर चर्चा करण्याची सवय लावली पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ अमर्याद स्वैराचार नसून जबाबदार अभिव्यक्ती आहे, ही जाणीव प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे.

एकूणच, ट्रोलिंगच्या युगात समाजजीवन आणि मान-सन्मान यांच्यासमोर अभूतपूर्व आव्हाने उभी राहिली आहेत. तंत्रज्ञानाने आपल्याला संवादाची अमर्याद शक्ती दिली आहे; परंतु त्या शक्तीचा वापर विवेकाने आणि जबाबदारीने केला गेला नाही तर सामाजिक सौहार्द, परस्पर विश्वास आणि व्यक्तीचा सन्मान धोक्यात येऊ शकतो. म्हणूनच आजच्या डिजिटल युगात केवळ तंत्रज्ञानाचा विकास पुरेसा नाही, तर माणुसकी, सभ्यता आणि परस्पर आदर यांचे जतन करणेही तितकेच आवश्यक आहे. समाज टिकविण्यासाठी स्वातंत्र्याबरोबर जबाबदारी आणि टीकेबरोबर सन्मान या मूल्यांचे पालन करणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात पुण्यतिथी निमित्त स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांना अभिवादन



परळी वैजनाथ दि.03 (प्रतिनिधी) लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात केंद्रीय ग्रामविकास मंत्री, माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख, संचालिका छायाताई देशमुख,संस्थेचे सचिव रवींद्र देशमुख, कार्यालयीन अधिक्षक अनिल पत्की उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख यांच्या हस्ते लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना संजय देशमुख म्हणाले की, लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे आहे. त्यांचे मराठवाड्याच्या विकासात मोठे योगदान आहे. ते संघर्षनेते होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा प्रविण फुटके यांनी तर आभार प्रा अशोक पवार यांनी मानले. कार्यक्रमास प्रा डॉ विना भांगे, प्रा विशाल पौळ, दिपक सातपुतेसह प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# दत्तगुरु अर्बन बँकेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

## चेअरमन गजानन निपटे यांचे उपस्थित राहण्याचे आवाहन

वडवणी | प्रतिनिधी

अवघ्या चार वर्षांपूर्वी ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या पिंपरखेड येथील दत्तगुरु अर्बन बँकेने अल्पावधीतच उल्लेखनीय प्रगती साधत यशाची उत्तुंग भरारी घेतली आहे. बँकेचे चेअरमन गजानन रमेशराव निपटे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे आणि ग्राहककेंद्री धोरणांमुळे बँकेने विश्वासार्ह आर्थिक संस्था म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

दि. 6 जून रोजी बँकेचा चौथा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास सर्व ग्राहक, सभासद, हितचिंतक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन चेअरमन गजानन निपटे



यांनी केले आहे.

सध्या बँकेच्या ठेवींचा आकडा तब्बल 9 कोटी 80 लाख रुपयांपर्यंत पोहोचला असून 6 कोटी 82 लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. वाढत्या कामकाजाच्या पार्श्वभूमीवर बँकेसाठी स्वतःच्या जागेत भव्य आणि सुसज्ज इमारत उभारण्यात आली असून बँकेचे नवीन इमारतीत यशस्वी स्थलांतर करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक बळ देण्याच्या उद्देशाने त्यांनी चार वर्षांपूर्वी दत्तगुरु अर्बन बँकेची स्थापना केली. आज या बँकेने हजारो शेतकरी, व्यावसायिक आणि ग्राहकांना आर्थिक आधार देत परिसराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

बँकेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत दत्तोपासक श्रीहरी महाराज पवार यांनी संचालक मंडळाचे अभिनंदन केले आहे. चौथ्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार, दि. 6 जून रोजी सकाळी 10 वाजता आयोजित कार्यक्रमास सर्व ग्राहक, सभासद व हितचिंतकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी तसेच नाश्ता व चहापानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चेअरमन गजानन दादा निपटे, संचालक मंडळ तसेच अधिकारी-कर्मचारी यांनी केले आहे.

## पान 1 वरुन

आवश्यक आहे," असे ते म्हणाले. त्यांनी शेतकऱ्यांना फळबाग लागवड, सूक्ष्म सिंचन आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. यावेळी 23 ते 29 जुलै 2026 दरम्यान गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने राबविण्यात येणाऱ्या 25 लाख वृक्ष लागवड व संवर्धन महाअभियानाची माहिती देण्यात आली. पर्यावरण संतुलनासाठी जलसंधारण आणि वृक्षसंवर्धन एकमेकांना पूरक असल्याचा संदेश देत ग्रामस्थांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. ग्रामस्थांनी लोकसहभागातून जमा केलेली लोकवर्गणी यावेळी मयंक गांधी यांच्याकडे सुपूर्द केली. कार्यक्रमास शेतकरी, महिला, ग्रामस्थ आणि विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रवींद्रजीत सिंह (टाटा ट्रस्ट) यांनी सांगितले की, "गावांचा एकोपा आणि ग्लोबल विकास ट्रस्टचे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. ही चळवळ अधिक व्यापक व्हावी आणि देशाचा विकास व्हावा यासाठी टाटा ट्रस्ट नेहमी सहकार्य करेल." दुष्काळाकडून समृद्धीकडे चाललेला प्रवास खरोखरच कौतुकास्पद असून, ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामाची व्याप्ती देशभर व्हावी असा मानस त्यांनी व्यक्त केला.पांडुरंग वाकसे (शेतकरी) म्हणाले की, ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आम्हाला भरपूर मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाली. वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळे आम्ही फळबाग लागवडीतून एकरी लाखांचे उत्पन्न घेत आहोत. पाण्याचा कायम दुष्काळ असलेल्या आमच्या गावातील सरस्वती नदीचे पुनरुज्जीवन होत असल्यामुळे आता आमच्या शेतीसाठी मुबलक पाणी मिळेल अशी आशा आहे. "शाश्वत पाण्यासाठी गावातील सर्व समाजघटक एकत्र आले आहेत. या उपक्रमाने केवळ पाणीच नाही, तर मनेही जोडली आहेत."

## पान 2 वरुन

डॉ.संदिपान काळे, बंडू काळे, वाल्मिक मुंडे, टी.डी. मुंडे, नवनाथसेठ मुंडे, जगनाथदादा मुंडे, विश्वनाथबापु मुंडे, दिलीप भालेराव, अशोकराव भांगे, हबीबभाई शेख, संभाजी मुंडे, शामराव दादा मुंडे, संदिपान महाराज मुंडे, हनुमंतराव मुंडे, लहुदास मुंडे, संजय श्रीराम मुंडे, राजेश वाघमारे, साहेबराव रोडे, अमर रोडे, अनंत मनोहर मुंडे, माणिक मुंडे, पाटील गित्ते, सुखदेव मुंडे, दत्ता मुंडे, बाबुराव पुजारी, वसंत मुंडे, श्रीनिवास मुंडे, मिनानाथ मुंडे, नागनाथ पारधे, शेषराव आबा मुंडे, रतन पांचगे, महादेव जनार्थन मुंडे, महादेव त्रिंबक मुंडे, आदिनाथ आघाव, पुरुषोत्तम मुंडे, बालाजी आघाव सर, व्यंकटी मुंडे, कोंडीराम मुंडे, अमोल फड, नामदेव मुंडे, राजेश मुंडे, वसंत रोडे, रामधन मुंडे, प्रल्हाद जगताप, राम मुरकुटे, लक्ष्मण मुंडे, भगवान मुंडे, भागवत मुंडे, बालाजी आघाव, गणेश संपत मुंडे, रामधन मुंडे, सूरज मुंडे, सीताराम आघाव, अनिल जाधव, तुकाराम अंगद मुंडे, भरत मुंडे, भास्कर मुंडे, संतोष पारधे आदी टोकवाडी येथील भगवान बाब गणेश मंडळ सर्व सदस्य, ज्येष्ठ नागरिक सर्व सदस्य, युवक, ग्रामस्थ, महिला मंडळ उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संजय मुंडे सर यांनी मानले आहे.लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी आयुष्यभर सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. समाजातील वंचित, शेतकरी आणि कष्टकरी घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. त्यांचे विचार आणि लोकाभिमुख नेतृत्व आजही समाजाला प्रेरणा देत आहे. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब हे जाती-पातीच्या भिंतींपलीकडे जाऊन सर्व समाजघटकांना सोबत घेऊन चालणारे लोकनेते होते. सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांनी समाजात एकात्मता आणि सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांचे विचार आणि कार्य आजही समाजाला दिशा देणारे आहेत. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब हे केवळ एक राजकीय नेते नव्हते, तर सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक होते. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याचा त्यांचा ध्यास होता. त्यांचे विचार, कार्य आणि संघर्ष आजही लाखो कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहेत. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी समाजातील सर्वसामान्य, शोषित आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे लोकाभिमुख नेतृत्व, जनतेप्रती असलेली बांधिलकी आणि विकासाची दूरदृष्टी आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

## पान 4 वरुन

रासायनिक खताच्या अतिरेकी वापराने जमिनी नापिक होवुन जाण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. यासाठी सेंद्रीय शेती हाच उत्तम पर्याय असुन अधिकाधिक शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेतीकडे वळले पाहिजे. राज्याचे माजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या विचाराची प्रेरणा यामागे आहे.हा उद्देश समोर ठेवून आपण स्वत: शेतकऱ्यांच्या जीवनाशी एकरुप होवुन प्रत्यक्ष शेती करणार असल्याचे म्हटले. यावेळी त्यांच्यासमवेत मा.खा.डॉ. प्रितमताई मुंडे, आर्यमन पालवे, अगस्त्य खाडे आदी उपस्थित होते. दरम्यान, यावेळी ना.पंकजाताई मुंडे व डॉ. प्रितमताई मुंडे यांनी आपल्या शेतातील बांधांवर वृक्षारोपणही केले.

---------------------------------------

करुन विनम्रभावे अभिवादन केले. यावेळी नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर खान राजाखान पठाण, मा.नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, रा.कॉ. गटनेते वैजनाथ सोळंके, भाजपा गटनेते तथा बांधकाम सभापती पवन मुंडे, निळकंठ चाटे, राजाभैय्या पांडे,योगेश मेनकुदळे, महेंद्र रोडे, डॉ. पुजा प्रितेश तोतला, अर्चना रोडे, जयराज देशमुख, भिमा डावरे, आश्विन आघाव, सुशिल हरंगुळे, संपत बळवंत, प्रणव मराठे, शेख मोहशीन, योगेश पांडकर, नगरसेवक बब्बु, पिंटु मुरकुटे, रमेश पवार, जयपाल लाहोटी,अनंत इंगळे, प्रितेश तोतला, भागवत गित्ते आदींसह न.प. अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------------------------

आश्वासन दिले. भेटीदरम्यान सौहार्दपूर्ण वातावरणात चर्चा झाली.

या सदिच्छा भेटीमुळे स्थानिक पातळीवरील विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सकारात्मक दिशा मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

-----------------------------------

2950 या भावांपैकी 1800 रुपये याप्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे वर्ग करण्यास सुरुवात केली सर्व शेतकऱ्यांचे घोषित केलेल्या भावाप्रमाणे 25 मे पर्यंत पैसे देण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित ठेवण्यात आले होते मात्र त्यानंतरही कारखाना प्रशासनाने शब्द पाळला नाही म्हणून स्थगित केलेले आंदोलन एक जून पासून पुन्हा सुरु करण्यात आले. कारखाना प्रशासनाच्या बेजबाबदार व असंवेदनशील भूमिकेमुळे आंदोलन जास्तच गळत गेले यावेळी प्रशासकीय स्तरावरुन मध्यस्थी केलेल्या अधिकारी वर्गाची ही हातबलता आंदोलकास दिसून आली. स्वर्गीय मुंडे साहेबांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आंदोलन काही दिवस स्थगित ठेवावे अशी विनंती करण्यात आली. विनंतीस आंदोलनकर्त्यांनी काही अटीच्या माध्यमातून सहमती दर्शवत घामाचा दाम कधी देणार याची निश्चित शाश्वती मिळत असेल तर आम्ही दोन पावले मागे हटण्यास तयार आहोत अशी भूमिका घेतली मात्र कारखाना व्यवस्थापनाने ऊस बिलाचे पैसे लांबवल्यामुळे मुलींच्या लग्नाचा, मुलांच्या शिक्षणाचा व शेतीतील विस्कटलेल्या कामाचा मोबदला कोण देणार? इथे आपण आमच्या घामाचे पैसे द्यायला तयार नाही तर या नुकसानाची भरपाई कोण करणार? या प्रश्नाचे कुणाकडेही प्रत्युत्तर नव्हते म्हणून आंदोलन पूर्णत्वाला नेत नाईलाजाने आंदोलनकर्त्यांनी ओंकार साखर कारखान्यास अखेर टाळे ठोकत सत्याग्रह आंदोलनाची सांगता केली. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या घामाचे दाम मिळत नाहीत तोपर्यंत आंदोलन व प्रश्नाचा असाच पाठपुरावा करत राहण्याचा संकल्प करून व स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांना श्रद्धांजली अर्पण करुन टाळे ठोकू आंदोलनाची सांगता करण्यात आली. या पुढची लढाई सातत्याने प्रशासकीय पातळीवर लढण्याचे ठरले असून ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती यांचे नेतृत्वाखाली असणारे पांगरी,बेलंबा, पिंपरी व इतर परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. विशेष करून पांगरी ग्रामस्थांनी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना सर्व प्रकारचे सुविधा पुरवली याबद्दल संघर्ष समितीकडून त्यांचे आभार व्यक्त करत पुढील काळात ऊस उत्पादक संघर्ष समिती व्यापक अंदोलन छेडणार असल्याचे संघर्ष समितीकडून सांगण्यात आले.

-------------------------------------------

उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडूनच स्पष्ट होत असेल, तर कोणतीही पुरेशी पडताळणी किंवा वस्तुस्थितीची खातरजमा न करता असा गुन्हा नोंदवण्यामागची नेमकी जबाबदारी कोणाची? हे निश्चित करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या चुकीच्या कारवाईमुळे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर गदा येते आणि पोलीस यंत्रणेच्या विश्वासार्हतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, याची तात्काळ सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. तसेच खोटा गुन्हा नोंदवण्यास जबाबदार असलेल्या दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. या पत्राच्या प्रतिलिपि त्यांनी पोलीस महासंचालक (महाराष्ट्र राज्य, मुंबई), विशेष पोलीस महानिरीक्षक (छत्रपती संभाजीनगर) आणि पोलीस अधीक्षक (बीड) यांना पुढील योग्य कारवाईसाठी पाठवल्या आहेत.जिल्ह्याची बदनामी करणाऱ्यांवर कारवाई व्हावीयापूर्वी बीड जिल्ह्यात अशा पद्धतीचे खोटे गुन्हे दाखल होत असल्यामुळे जिल्ह्याची मोठी बदनामी झाली होती आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला होता. गेल्या वर्षभरापासून जिल्ह्यातील परिस्थितीत सुधारणा झाली असताना, आज पुन्हा काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून खोटे गुन्हे दाखल करण्यास कोण सांगत आहे? याचा शोध घेणे गरजेचे आहे, असा थेट सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी केला आहे.

-------------------------------------------

अनुभवल्या. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्वगुण, जनसंपर्क आणि अभ्यासू वृत्तीमुळे ते अल्पावधीतच जनतेचे लोकप्रिय नेते बनले.आजच्या तरुण पिढीने गोपीनाथरावजी मुंडे यांच्या जीवनातून अनेक मूल्ये आत्मसात करावीत. प्रामाणिकपणा, परिश्रम, जिद्द, लोकसेवा आणि समाजहिताची भावना या गुणांचा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून घालून दिला. प्रतिकूल परिस्थितीतही हार न मानता संघर्ष करत राहिल्यास यश निश्चित मिळते, हे त्यांच्या जीवनातून शिकायला मिळते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक लोकप्रिय, अभ्यासू आणि जनतेशी जोडलेला नेता गमावला. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी आजही अनेकांना जाणवते. मात्र त्यांचे विचार, कार्य आणि जनसेवेचा वारसा आजही लाखो कार्यकर्त्यांना आणि तरुणांना प्रेरणा देत आहे."

यावेळी उपस्थित शिक्षकांनीही लोकनेते मुंडे यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि विकासाभिमुख कार्याची माहिती देत उपस्थितांना प्रेरित करण्यात आले. कार्यक्रम शांत व आदरपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. कोगुरवार सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. डोळे सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. अशा प्रकारे संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभाग येथे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याला अभिवादन करत जनसेवा, संघर्ष आणि लोकहिताच्या विचारांचा संदेश देण्यात आला.

-----------------------------------------------

बळकट झाली आहे. त्यांचा हा विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी बँक सदैव कटिबद्ध राहील, असा पुनरुच्चार या वेळी करण्यात आला. कार्यक्रमास उपस्थित मान्यवर:या अभिवादन प्रसंगी बँकेचे अध्यक्ष मा.श्री. विनोद सामत, उपाध्यक्ष मा.श्री. रमेश कराड यांच्यासह संचालक मंडळातील खालील मान्यवर उपस्थित होते:श्री.प्रकाश जोशी,श्री.अनिल तांदळे,श्री.संदीप लाहोटी, डॉ.श्री.राजाराम मुंडे,श्री.प्रवीण देशपांडे,श्री. महेश्वर निर्मळे,श्री.विजय वाकेकर,श्री.अमोल डुबे,श्री.कुलभूषण जैन,श्री. सुशांत लोमटे,व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विनोद खर्चे तसेच सरव्यवस्थापक श्री.संजय खंदाडे आणि जेष्ठ सभासद श्री.कवडे सर छायाचित्रात दिसत आहेत.

----------------------------------------------

शिवरायांच्या स्मारकाचीच विटंबना होत असल्याची खंत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

केवळ निकृष्ट बांधकामच नव्हे, तर स्मारकाच्या आजूबाजूचा परिसर दुर्गंधीयुक्त झाला आहे. नगरपरिषद आणि एस.टी. परिवहन महामंडळ प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे छत्रपतींच्या स्मारकाची वारंवार विटंबना होत असल्याचा आरोप दत्ता कांबळे यांनी केला.

या निवेदनाद्वारे काँग्रेसने प्रशासनाकडे तातडीने तीन मागण्या केल्या आहेत: 1. गळून पडलेल्या चौथऱ्याची चौकशी करून ठेकेदारावर फौजदारी कारवाई करावी. 2. स्मारक परिसराची कायमस्वरूपी स्वच्छता ठेवावी आणि दुर्गंधी दूर करावी. 3. स्मारकाच्या सुरक्षेसाठी नगरपरिषदेने दिवस-रात्र पाळीसाठी कायम कर्मचारी नेमावा."छत्रपती शिवरायांच्या स्मारकाची अवहेलना आम्ही सहन करणार नाही. मागण्यांची तात्काळ अंमलबजावणी न झाल्यास राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशारा दत्ता कांबळे यांनी दिला. यासोबतच नागरिकांनीही स्मारकाचे पावित्र्य राखावे, असे आवाहन त्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.यावेळी वरिष्ठ उपाध्यक्ष महावीर मस्के, शहराध्यक्ष अफरोज तांबोळी, अशोक कांबळे, अहमद शेख, किसन लोखंडे, विठ्ठल कांबळे, कल्याण भारस्कर, जानुशाह शेख, करामा अनसारी, पप्पू कसबे, फारुख शेख, आदित्य कांबळे, धुराजी कांबळे, दिगंबर कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

----------------------------------------

आली. यावेळी सर्वानुमते शिवराज माने यांची असोसिएशनच्या अध्यक्षपदी, प्रदीप मुजमुले यांची सचिवपदी तर विजय नवले यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर ज्येष्ठ दिवंगत फोटोग्राफर्सना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमात अशोक कागदे, सुनील फुलारी, सोमेश घेवाडे यांसह आदी उपस्थित होते. प्रास्ताविक सर्वज्ञ जोशी यांनी तर सूत्रसंचालन प्रवीण वडमारे यांनी केले. नवनिर्वाचित अध्यक्ष शिवराज माने यांनी फोटोग्राफी व्यवसायात इव्हेंट्स आणि ॲग्रीमेंट चे महत्त्व, रेटची एकसंधता आणि फोटोग्राफर्सच्या हक्कांचे संरक्षण यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

-------------------------------------------

बोबडे यांच्या झालेल्या नुकसानीबाबत अदयाप पर्यन्त कुठलाही विचार केलेला नाही. त्यामुळे बोबडे यांच्या वर उपासमारीची वेळ येत आहे. बोबडे यांनी बऱ्याच वेळा सदरील कार्यालयास पाठपुरावा केलेला आहे. परंतु सदरील अधिकारी कसलीही दखल न घेता उडवा उडवीचीच उत्तरे देत आहेत.तरी मे. साहेबांनी सदरील जलजिवन विहिरीचा पंचनामा करुन केलेले नदीपात्रातील अतिक्रमण हाटवुन बदलले नदीचे पात्र पाणी प्रवाह पुर्ववत करुन बोबडे यांचे झालेले नुकसान संबधीत विभागाकडुन बोबडे यांना देण्याचे आदेश द्यावेत व पुढील काळात बोबडे यांच्या जमीनीचे विहीरीचे पिकाचे नुकसान होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी अशी मागणी सत्यप्रेम बोबडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे तरी जिल्हाधिकारी साहेब एका गरीब शेतकऱ्यांला न्याय देणार का असा प्रश्न उपस्थित केला आहे.

-----------------------------------------------

स्मृतींना उजाळा आणि गौरवस्वर्गीय बाबुराव टोपाजी (बी. टी.) पवार यांनी आपल्या आयुष्यात केलेल्या सामाजिक कार्याची आणि त्यांच्या योगदानाची आठवण म्हणून या परिसराला त्यांचे नाव देण्याचा एकमुखी निर्णय ग्रामस्थांनी घेतला होता. त्यानुसार काल रविवारी विधीवत पूजनाने आणि नामकरणाच्या पाटीचे अनावरण करून या भागाचे 'बी. टी. पवार नगर' असे नामकरण करण्यात आले. "स्वर्गीय बाबुराव पवार यांचे विचार आणि त्यांनी दिलेले योगदान समाजासाठी नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. या नामकरणामुळे त्यांच्या स्मृती या परिसरात कायम जिवंत राहतील," अशा भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या.ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण

या नामकरण सोहळ्यामुळे गट नंबर 160 परिसरातील नागरिकांमध्ये कमालीचा उत्साह आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पवार नगरमधील तरुण मंडळी आणि ज्येष्ठ नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले. सोहळ्यानंतर उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला आणि कार्यक्रमाची सांगता अत्यंत उत्साहात झाली

-----------------------------------------

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
गुरुवार दि. 04 जुन 2026


# ना.पंकजाताई मुंडेंचा सेंद्रीय शेतीचा संकल्प ; स्वत: ट्रॅक्टर चालवत केली नांगरणी

## दुपारी गोपीनाथगडावरुन संकल्प ; सायंकाळी प्रत्यक्ष कृतीला सुरुवात



परळी वैजनाथ, दि. 03 --राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे हया आपल्या कार्यपद्धती तून नेहमी आगळेवेगळे संकल्प करत असतात, असाच एक संकल्प त्यांनी आज लोकनेते मुंडे साहेबांच्या स्मृतीदिनी केला आणि सायंकाळी प्रत्यक्ष कृतीला सुरूवातही केली. सेंद्रीय शेती करण्यासाठी त्यांनी शेतात स्वतः ट्रॅक्टर चालवत नांगरणी केली, त्यांच्या या अनोख्या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या आजच्या स्मृती दिनानिमित्त पर्यावरण पूरक विविध संकल्प ना.पंकजाताई मुंडे यांनी जाहीर केले. गोपीनाथगडावरील कार्यक्रमात वृक्षारोपण व वृक्ष वितरण करुन या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या अनुषंगाने जैविक व नैसर्गिक शेतीला प्राधान्य दिले जावे यासाठी मी स्वत: सेंद्रीय शेती करणार असल्याची घोषणा त्यांनी दुपारी केली आणि लगेचच प्रत्यक्ष अंमलबजावणी करत सायंकाळी देशमुख टाकळी येथील आपल्या स्वत:च्या शेतात सेंद्रीय शेती उपक्रमाचा प्रारंभ केला. यावेळी मुलगा आर्यमन सोबत स्वत: ट्रॅक्टर चालवत नांगरणी केली.

पर्यावरण संवर्धनासाठी ना. पंकजाताई मुंडे यांनी विविध संकल्प सर्वांसमोर मांडले. यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे आवाहनही त्यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "एक पेड माँ के नाम" या उपक्रमाच्या धर्तीवर "एक पेड पिता के नाम" उपक्रम राबविण्याचे त्यांनी आवाहन केले.

शेती आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी नैसर्गिक शेतीला प्राधान्य दिले पाहिजे तरच जमिनीचा पोत कायम राहील अन्यथा पान 3 वर

# परळी नगरपरिषदेत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना अभिवादन

## नगराध्यक्षांसह सर्व नगरसेवकांनी जागवल्या आठवणी



परळी वैजनाथ, दि. 03

दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या बाराव्या स्मृतीदिनानिमित्त परळी वैजनाथ नगर परिषद कार्यालय येथे प्रतिमा पूजन करुन लोकनेत्याला विनम्र अभिवादन करण्यात आले. दिवंगत गोपीनाथराव मुंडे हे लोकोत्तर लोकपुरुष आहेत. त्यांच्यासारखा लोकनेता पुन्हा होणे नाही. वंचित, उपेक्षित घटकांच्या न्यायासाठी अविरत संघर्ष करणारे ते अव्दितीय लोकनेते होते अशा शब्दात नगराध्यक्ष पद्मश्री धर्माधिकारी यांनी अभिवादन केले.

परळी न.प. कार्यालय येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या बाराव्या स्मृती दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका त्याचबरोबर प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्या लाडक्या लोकनेत्यास पुष्प अपर्ण पान 3 वर

# देवगिरी निवासस्थानी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची कैलास कावरे यांनी घेतली सदिच्छा भेट



मुंबई, प्रतिनिधी :

आज मुंबई येथील देवगिरी निवासस्थान येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा ज्येष्ठ नेत्या सुनेत्राताई पवार यांची युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी कामानिमित्त सदिच्छा भेट घेतली.

यावेळी विविध सामाजिक, विकासात्मक तसेच जनहिताच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. कैलास कावरे यांनी आपल्या मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या व प्रलंबित प्रश्नांविषयी माहिती देत त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनीही विविध विषयांवर मार्गदर्शन करत जनतेच्या हिताच्या कामांना प्राधान्य देण्याचे पान 3 वर

# ..अखेर ओंकार साखर कारखान्यास शेतकऱ्यांनी ठोकले टाळे!




परळी / प्रतिनिधी

ऊस बिलाच्या थकीत रकमेसाठी शेतकऱ्यांनी विविध मार्गाने मागील मार्च महिन्यापासून ओंकार साखर कारखाना क्र 8 कडून वारंवार टाळाटाळ होत असल्याने संघर्ष समितीकडून करण्यात आलेल्या सत्याग्रह आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी कारखान्यास टाळे लावत या आंदोलनाची सांगता करण्यात आली. या प्रसंगी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून स्व.मुंडे साहेबांच्या स्मृतिदिनीनिमित्त अभिवादन करत मग्रूर साखर कारखानदार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत शेतकऱ्यांनी आपला संताप व्यक्त केला.

थकीत ऊस देयकाप्रश्नी दि 8 व 9 मे रोजी संघर्ष समितीच्या बेमुदत धरणे आंदोलनानंतर कारखान्याने घोषित केलेल्या पान 3 वर

# खोट्या गुन्ह्याप्रकरणी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करा !

## » बीड ग्रामीण पोलीस ठाण्यातील प्रकरणानंतर खा.बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र!



केज प्रतिनिधी/रोहन गलांडे

बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झालेला एक गुन्हा खोटा असल्याचे समोर आल्यानंतर, या प्रकरणी निष्पाप नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या आणि खोटा गुन्हा दाखल करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना थेट पत्र पाठवले असून, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दि.31 मे 2026 रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक 0192 ची नोंद करण्यात आली होती. मात्र, हा गुन्हा नोंद झाल्यानंतरच्या दुसऱ्याच दिवशी उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सदर गुन्हा खोटा असल्याची माहिती अधिकृतपणे दिली. जर एखादा गुन्हा खोटा असल्याची माहिती पान 3 वर

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे जीवन म्हणजे जिद्द, कर्तृत्व आणि जनकल्याणासाठी वाहिलेल्या आयुष्याचा प्रेरणादायी प्रवास – श्री. दीपक तांदळे

## संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त कृतज्ञ अभिवादन



परळी (प्रतिनिधी) – शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभाग येथे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी त्यांच्या कार्याचे गौरवपूर्वक स्मरण करत उपस्थितांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री पद्मावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव श्री. दीपक तांदळे तसेच शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. गायकवाड सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे तसेच शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना संस्थेचे सचिव श्री. दीपक तांदळे यांनी गोपीनाथरावजी मुंडे यांच्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, "महाराष्ट्राच्या राजकारणात जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारे, ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणारे आणि जनसेवेसाठी आयुष्य समर्पित करणारे नेतृत्व म्हणजे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे. आपल्या कर्तृत्व, संघर्षशील वृत्ती आणि लोकांशी असलेल्या घट्ट नात्यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि विकासात्मक क्षेत्रात अमूल्य योगदान दिले. म्हणूनच त्यांना 'लोकनेते' हा बहुमान प्राप्त झाला. गोपीनाथरावजी मुंडे यांचा जन्म 12 डिसेंबर 1949 रोजी बीड जिल्ह्यातील परळी तालुका येथील नाथ्रा या गावात एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत असताना त्यांनी समाजातील विविध समस्या जवळून पान 3 वर

# लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांना वैद्यनाथ अर्बन बँकेत विनम्र अभिवादन



परळी वैजनाथ:

वैद्यनाथ अर्बन को - ऑप बँक लि.च्या मुख्य कार्यालयात लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना बँकेच्या वतीने भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. स्व. मुंडे साहेब या बँकेचे खरे प्रेरणास्थान असून त्यांच्याच विचारांवर बँकेची यशस्वी वाटचाल सुरु असल्याचा सूर या वेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ:

स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या कष्ट आणि दूरदृष्टीमुळे वैद्यनाथ बँकेचा विस्तार झाला. ही बँक नेहमीच गोरगरीब, कष्टकरी आणि शेतकरी बांधवांच्या व व्यापारी यांच्या स्वप्नातील बँक म्हणून ओळखली जाते. बँकेच्या माध्यमातून नेहमीच गरजू घटकांना आर्थिक पाठबळ देण्यात आले असून, मुंडे साहेबांच्या सहकार क्षेत्रातील अमूल्य योगदानामुळेच ग्रामीण अर्थव्यवस्था पान 3 वर



• आमचे मित्र हभप गोपळ महाराज आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना अश्विन मोगरकर, दत्ता जोगदंड पाटील, धनंजय आढाव, प्रा.प्रविण फुटके, मोहन व्हावळे, महादेव शिंदे, श्रीराम लांडगे अदी दिसत आहेत

पाहिजेत
श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित
संस्कार प्राथमिक शाळा
ता. परळी वैजनाथ, जि. बीड
परळी शहरातील नामांकित शिक्षण संस्था संस्कार प्राथमिक शाळेत तासिका तत्वावर खालील पदे त्वरित भरणे आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | पद संख्या |
|---|---|---|
| 01 | B.Ed. Science (शिक्षक) | 01 |
| 02 | D.Ed. (शिक्षिका) | 02 |
| 03 | A.T.D | 01 |
| 04 | बालवाडी (पदवीधर - शिक्षिका) | 01 |

10 जुन
उमेदवारांनी बुधवार दि. 10 जुन रोजी मूळ कागदपत्रांसह सकाळी 10 ते 1 या वेळेत स्वखर्चाने प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित रहावे.
स्थळ - संस्कार प्रा. शाळा
• पदमावती विभाग, परळी वैजनाथ •
मुख्याध्यापिका -
• संस्कार प्रा. शाळा, परळी वैजनाथ •
मोबा. 9822955953

# शिवरायांच्या पावित्र्याला तडा" - निकृष्ट बांधकामामुळे स्मारकाची विटंबना, काँग्रेस आक्रमक

## • नवीन बसस्थानक परिसरातील स्मारकाच्या चौथऱ्याची फरशी गळून पडली; दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन



माजलगाव | प्रतिनिधी

शहराच्या मध्यभागी नवीन बसस्थानक परिसरात मोठ्या थाटात उद्घाटन झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाच्या पावित्र्याला तडा जाऊ लागला आहे. स्मारकाच्या चौथऱ्याच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यामुळे फरशी गळून पडल्याचा आरोप करत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, नवीन बसस्थानक परिसरात शिवरायांच्या स्मारकाचे बांधकाम सुरु असून चौथऱ्याचे काम पूर्ण झाले आहे. मात्र या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असून निकृष्ट दर्जाचे बांधकाम झाल्याने चौथऱ्यावरील फरशी गळून पडली आहे. "अर्थपूर्ण भ्रष्टाचारामुळे" पान 3 वर

# बीड प्रोफेशनल फोटोग्राफर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी शिवराज माने



प्रतिनिधी | बीड

जिल्ह्यातील प्रोफेशनल फोटोग्राफर्सना एकत्रित आणून त्यांच्या संघटन, रेट आणि ॲग्रीमेंट या प्रमुख विषयांवर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली 'चिंतन-मंथन बैठक' पार पडली. शेकडो फोटोग्राफर्सच्या उपस्थितीत झालेल्या या ऐतिहासिक बैठकीत बीड प्रोफेशनल फोटोग्राफर्स असोसिएशनची अधिकृत स्थापना करण्यात पान 3 वर

# केजडी नदीच्या मुख्य पात्रातील अतिक्रमण हटवुन पाण्याचा प्रवाहात पुर्ववत करा, जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी !



केज प्रतिनिधी/रोहन गलांडे केज तालुक्यातील मौजे बोबडेवाडी येथील शेतकरी सत्यप्रेम बोबडे रहीवाशी आसुन शेती करुन उपजिवीका करतात मौजे, बोबडेवाडी येथील गट नं. 361 मध्ये त्यांची जमीन व एक स्वतंत्र विहिर आसुन सदरील जमीनच्या लगत पश्चिम बाजुस केजडी नदीचे मुख्यपात्रात को.पा.ब.चे बुडीत क्षेत्रात जलजिवन विहीरीचे खोदकाम करुन केजडी नदीमध्ये जाणीवपुर्वक अतिक्रमण केले आहे. व प्रवाहात बदल घडवलेला आहे. त्यामुळे सदरील पाणी बोबडे यांच्या जमीनीत व विहीरीत शिरुन त्यांची जमीनीतील पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. व विहीर पण अर्ध्यापेक्षा जास्त बुजली आहे. या बाबत बोबडे यांनी वेळोवेळी सदरील कार्यालयास विनंती करुनही अदयाप पर्यन्त कुठलीही कार्यवाही झालेली नाही. व पान 3 वर

# भाटवडगाव येथे 'बी. टी. पवार नगर'चा नामकरण सोहळा उत्साहात संपन्न

## • स्वर्गीय बाबुराव टोपाजी पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ परिसराला दिले नाव; ग्रामस्थांची मोठी उपस्थिती



माजलगाव / प्रतिनिधी माजलगाव शहराच्या अगदी हाकेच्या अंतरावर भाटवडगाव:येथील गट नंबर 160 परिसरामध्ये काल, रविवार दिनांक 31 मे 2026 रोजी एका विशेष आणि उत्साही वातावरणात बिटी पवार नगर चा नामकरण सोहळा संपन्न झाला. या परिसराला सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय बाबुराव टोपाजी पवार यांच्या मरणार्थ 'बी. टी. पवार नगर' असे नाव देण्यात आले आहे.

या सोहळ्याप्रसंगी परिसरातील नागरिक, पवार कुटुंबिय आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पान 3 वर